# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/01/2023 (सोमवार) सकाळ

### चोरी

**पो.स्टे. खापरखेडा :–** अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील कन्हान नदीचे पात्र भाणेगाव येथे दिनांक २१/०१/२०२३ चे १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पोलीस उपनिरीक्षक जानुसिंग जाधव पो. स्टे. खापरखेडा हे ऑल आउट मोहीम दरम्यान पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या माहितीवरून नमुद आरोपी नामे– १) सुधाकर हुकुमचंद कुंभार रा. डोरली ता. पारशिवनी २) स्वप्नील रामाजी गजभिये, वय ३० वर्ष, रा. बिनासंगम ३) शितल तुळशीदास गजभिये, वय ३७ वर्ष, रा. डोरली ४) मोहन गजानन केळवदे, वय ३२ वर्ष, रा. बिनासंगम ५) देविदास शामराव मेश्राम वय ३८ वर्ष, रा. बिनासंगम यांनी संगणमत करून MSEB येथील दहा लोखंडी रॉड किंमती अंदाजे असा एकुण ८०००/– रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १) ते ५) यांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार कैलास पवार ब. नं. ११९ पोस्टे खापरखेडा मो. न. ९८८११४३९२७ हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ५०० मी. अंतरावरील मौजा पोतदार हॉस्पीटल च्या बाजुला कळमेश्वर येथे दिनांक १४/०१/२०२३ ते दिनांक २२/०१/२०२३ चे १७.३० वा. ते १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दुर्वेश भुपेश मेहरे, वय ३४ वर्ष, रा. न्यु स्नेह नगर प्लॉट नं १४ वर्धा रोड नागपुर हे आपल्या दुकानाला लॉक लावुन गेले असता फिर्यादी हे आपले दुकानात परत आले तेव्हा दुकानाचे लॉक उघडत नव्हते ते जाम झाले होते म्हणुन फिर्यादीने जवळ असलेल्या चाबीने लॉक उघडले असता १) एक पॅनोसोनिक कंपनीचे ५५ इंच एल ए डी टिव्ही किंमती अंदाजे २०,०००/–रू (२) एक व्ही यु कंपनीचे ५५ इंच एल ए डी टिव्ही किंमती अंदाजे २०,०००/–रू (३) एक झेब्रोनिक्स कंपनीचे म्युजिक सिस्टीम किंमती अंदाजे ६०००/–रू (४) सि.सि.टी.व्ही कॅमेरा किंमती अंदाजे २०००/–रू. असा एकुण ४८,०००/– रूपयाचा मुददेमाल फिर्यादीचे दुकानातुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक पाली मो. नं. ९०११०३८६७७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**